# ऑलिव्ह रिडले कासवाचे उपग्रहीय टॅगद्वारे मार्गनिरिक्षण

ऑलिव्ह रिडले कासवांची घरटी महाराष्ट्र किनारपट्टीवर विखुरलेली आढळतात. आजतागायत ऑलिव्ह रिडले कासवांचे टॅगिंग फक्त भारताच्या पूर्वी किनाऱ्यावरच होत आले आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रथमच वेळास येथे ऑलिव्ह रिडले कासवाला उपग्रहीय (सॅटेलाईट) टॅगिंग करण्यात आले.

कांदळवन प्रतिष्ठान, महाराष्ट्र वन विभागामार्फत 'ऑलिव्ह रिडले कासवांच्या सागरी स्थलांतरण मार्गाचे उपग्रहीय निरीक्षण' या वैज्ञानिक प्रकल्पाकरीता भारतीय वन्यजीव संस्थानाला अनुदान दिले जात आहे. या अभ्यासातून ऑलिव्ह रिडले कासवांच्या पश्चिम किनाऱ्याजवळील सागरातील भ्रमणाबाबत माहिती मिळण्यास मदत होईल.

या प्रकल्पांतर्गत एकूण ५ ऑलिव्ह रिडले कासवांना उपग्रह टॅग लावले जाणार आहेत. ज्यातील पहिले कासव वेळास येशे टॅग केले गेले. महाराष्ट्रातील आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील हे टॅग केलेले पहिले कासव असल्याने त्याला 'प्रथम' असे नाव देण्यात आले आहे. यासोबत कासव संवर्धनातील एका नवीन पर्वाला सुरवात झाली आहे.

कांदळवन प्रतिष्ठान, महाराष्ट्र वन विभाग व भारतीय वन्यजीव संस्थान रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गातील विविध किनाऱ्यावरील आणखी चार ऑलिव्ह रिडले कासवांना असे टॅग लावणार आहे.